आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२४ जून २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- १८व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाला प्रारंभ/ नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी सुरु

- आपल्या सरकारला सर्वांना सोबत घेऊन आणि संविधानाचं पावित्र्य राखून लवकर निर्णय घ्यायचे असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधकांची लोकसभेत घोषणाबाजी

- नीट-यूजी परीक्षा पेपरफुटीप्रकरणी कारवाईला वेग

**आणि**

- आयसीसी पुरुष क्रिकेट टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर ८मध्ये आज भारताचा सामना ऑस्ट्रेलियाशी

**<><><><><>**

१८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन आजपासून सुरू झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात भर्तृहरी महताब यांना हंगामी सभापती म्हणून शपथ दिली. भर्तृहरी महताब यांनी संसदेच्या नवनिर्वाचित खासदारांना सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ दिली. त्यानंतर सर्व सदस्यांचा शपथविधी सुरू झाला आहे. सभापतींनी सर्वप्रथम वाराणसीचे खासदार नरेंद्र मोदी यांना शपथ दिली. सभापती निवडीपर्यंत लोकसभेचे कामकाज चालविण्यात मदत करण्यासाठी नियुक्त केलेल्या

अध्यक्षांच्या तालिकेला शपथ देण्यात आली. भाजप खासदार राधामोहन सिंग आणि फग्गन सिंग कुलस्ते यांनी तालिका सदस्य म्हणून शपथ घेतली. मात्र, काँग्रेसचे खासदार के सुरेश, द्रमुकचे खासदार टी. आर. बाळू आणि टीएमसीचे सुदीप बंदोपाध्याय यांनी शपथ घेतली नाही. केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, शिवराज सिंह चौहान, नितीन गडकरी, मनोहर लाल, पीयूष गोयल, जितनराम मांझी, राजीव रंजन सिंह, वीरेंद्र कुमार, किरेन रिजिजू, चिराग पासवान, आणि इतर सदस्यांनी सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. केंद्रीय मंत्री एचडी कुमारस्वामी आणि प्रल्हाद जोशी यांनी कन्नड भाषेत तर धर्मेंद्र प्रधान आणि जुआल ओरम यांनी ओडिया भाषेत शपथ घेतली. केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आसामी भाषेत तर के राम मोहन नायडू यांनी तेलुगू भाषेत शपथ घेतली. तर पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी मराठीतून शपथ घेतली. लोकसभेत आज आणि उद्या नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी होणार आहे.

येत्या बुधवारी २६ जूनला नवीन लोकसभा सभापतींची निवड होणार आहे. राज्यसभेचं अधिवेशन येत्या गुरुवारी २७ जूनला सुरु होणार असून त्याच दिवशी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण होईल. अधिवेशन ३ जुलैपर्यंत चालेल.

**<><><><><>**

विकसित भारत घडवण्याच्या संकल्पाने १८ व्या लोकसभेचे पहिलं अधिवेशन सुरू होत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आपलं सरकार देशसेवेसाठी आणि जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी म्हटलं. अधिवेशनापूर्वी संसदेच्या आवारात त्यांनी पत्रकारांना संबोधित केलं. आपल्या सरकारला सर्वांना सोबत घेऊनआणि

संविधानाचे पावित्र्य राखून लवकर निर्णय घ्यायचे असल्याचं त्यांनी सांगितलं. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच लोकसभेच्या खासदारांचा शपथविधी सोहळा नवीन संसद भवनात होत असल्याचं ते म्हणाले. लोकशाहीची प्रतिष्ठा राखण्यासाठी विरोधकांकडून योग्य वर्तनाची अपेक्षा असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

इंडिया आघाडीच्या खासदारांनी आज लोकसभेत संविधानाची प्रत घेऊन प्रवेश केला. काँग्रेस, नेते मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी, राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, द्रमुकचे टी आर बालू यांच्यासह अनेक सदस्यांनी घोषणाबाजी केली. समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव यांच्यासह इतर खासदारही संविधानाची प्रत घेऊन सभागृहात आले होते.

नीट परीक्षेतली कथित अनियमितता, पश्चिम बंगालमधला रेल्वे अपघात या मुद्यांवरून काँग्रेसने सरकारवर टीका केली आहे. या मुद्द्यांवर सरकार गप्प का? असा सवाल काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी संसदेच्या आवारात प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये होणाऱ्या अमरनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर अनंतनाग जिल्ह्यात पहलगाम इथं राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक काल झाली. यात निवृत्त मेजर जनरल सुधीर बहल यांनी आपत्ती व्यवस्थापनाच्या कामात सहभागी असलेल्या विविध संस्था आणि विभागाच्या तयारीचा आढावा घेतला. एनडीआरएफ, एसडीआरएफ, जम्मू काश्मीर पोलीस, सीआरपीएफ, भारतीय हवामान विभाग, अग्निशमन दल या संस्थांनी सुधीर बहल यांच्यासमोर सादरीकरण केलं.

दरम्यान, जम्मू काश्मीरच्या आरोग्य विभागाचे संचालक डॉ. मुश्ताक अहमद यांनी चंदनवाडी बेस कॅम्प रुग्णालय ते शेषनाग बेस कॅम्प रुग्णालय इथल्या आरोग्य सुविधांची पाहणी केली. चंदनवरी, मीड मिसु, पिसु टॉप, मीड झोजीबल, झोजीबल, नागाकोटी या रुग्णालयातल्या आरोग्य सुविधांचा त्यांनी आढावा घेतला. तसंच रोजच्या तयारीची माहिती देण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

**<><><><><>**

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट-यूजी परीक्षा पेपरफुटीप्रकरणी कारवाईला वेग आला आहे. केंद्रीय अन्वेषण संस्थेकडे हा तपास सोपवण्यात आला असून सीबीआयने याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. नीट-यूजी पेपरफुटी आणि गैरव्यवहार प्रकरणी विविध यंत्रणांनी विविध राज्यांतून अनेक संशयितांना ताब्यात घेतलं आहे. त्यांची चौकशी सुरु आहे.

अतिरिक्त गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा काल झाली. एकंदर ८१३ विद्यार्थ्यांनी ही फेरपरीक्षा दिल्याची, तर साडेसातशे विद्यार्थी गैरहजर राहिल्याची माहिती राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं दिली आहे. दरम्यान, विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर कालची नीट-पदव्युत्तर परीक्षा पुढे ढकलण्यात आली. या प्रकरणाची पुढची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात ८ जुलै रोजी होणार आहे.

**<><><><><>**

१२व्या पारपत्र दिनानिमित्त परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी पारपत्र कार्यालयातले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. नागरिकांना पारपत्र सेवा विश्वासार्ह आणि वक्तशीर मिळावी याकरता पारपत्र कार्यालयं करीत असलेल्या प्रयत्नांचं त्यांनी कौतुक केलं. २०२३ मधे देशात एक कोटी ६५ लाख

नागरिकांना पारपत्र देण्यात आली अशी माहिती त्यांनी दिली. नागरिकांना देशात आणि देशाबाहेरही सुलभपणे पारपत्रं मिळावी याकरता डिजीलॉकर, पासपोर्ट पोलीस अप अशा अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असल्याचंही जयशंकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल संयुक्त अरब अमिरातीचे परराष्ट्रव्यवहार मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद बिन सुलतान अल नाहयान यांची अबुधाबी इथं भेट घेतली. या दोन देशांमधल्या वाढत जाणाऱ्या धोरणात्मक भागीदारीवर या भेटीत सकारात्मक आणि फलदायी चर्चा झाल्याची माहिती जयशंकर यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधून दिली आहे. तसंच स्थानिक आणि जागतिक मुद्द्यांवरही चर्चा झाल्याचं त्यांनी नमूद केलं आहे.

**<><><><><>**

गाझापट्टीतल्या संघर्षाचा जोर ओसरला असला तरी हमासला पूर्णपणे सत्ताच्युत करेपर्यंत युद्ध चालूच राहील, असं इस्राएलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांनी जाहीर केलं आहे. दूरचित्रवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितलं की, इस्राएली फौजा लौकरच लेबनॉन हद्दीवर पाठवल्या जातील. या भागात हिजबुल्लांबरोबर गेले काही दिवस चकमकी वाढल्या आहेत.

**<><><><><>**

रशियाच्या उत्तर कॉकेशस प्रांतातल्या डर्बेंट आणि माखाचकाला या शहरांमध्ये सशस्त्र हल्लेखोरांनी काल केलेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १७वर पोहोचली आहे. यात १५ पोलीस अधिकारी, १ धर्मगुरू आणि एका

सुरक्षारक्षकाचा समावेश आहे. सहा हल्लेखोर ठार झाले असून इतरांचा शोध सुरू आहे.

<><><><><>

आयसीसी पुरुष क्रिकेट टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर ८मध्ये आज भारताचा सामना ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. सेंट लूसिया इथल्या डॅरेन सॅमी मैदानावर भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी ८ वाजता हा सामना सुरू होईल. सुपर ८ मध्ये भारतानं आत्तापर्यंत अफगाणिस्तान आणि बांगलादेश या दोन्ही संघांचा पराभव केला आहे. आज ऑस्ट्रेलियाविरुद्ध विजय मिळवल्यास भारताचा संघ या गटात पहिल्या स्थानी पोहोचेल, शिवाय उपांत्य फेरीतलं भारताचं स्थानही निश्चित होईल. दरम्यान, आज सकाळी दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज यांच्यात झालेल्या सामन्यात पावसाचा व्यत्यय आल्यानंतर डकवर्थ लुइस पद्धतीनं दक्षिण आफ्रिकेनं वेस्ट इंडीजवर मात केली. तत्पूर्वी काल रात्रीच्या सामन्यात गतविजेत्या इंग्लंडनं अमेरिकेचा १० गडी राखून पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघांदरम्यान तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेच्या काल झालेल्या शेवटच्या सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेचा ६ खेळाडू राखून पराभव केला आणि मालिकाही ३-० अशी जिंकली.

//<><><><><>//